॥कर्दळीवन॥ सेवा संघ
आयोजित


वयोमर्यादा १८ ते ७० वर्षे

# द्रोणागिरी पर्वत आणि नीती व्हॅली परिक्रमा


**परिक्रमा सहभागी शुल्क**
**केवळ ₹ ३०,०००/-**

फक्त ₹ १०,०००/- भरून नोंदणी करा

**१७ ते २७ सप्टेंबर २०२०**
**हरिद्वार ते हरिद्वार - ११ दिवस**



**दिव्य औषधी वनस्पतींचे सान्निध्य आणि औषधी कुंडामध्ये स्नान**



सर्व माहिती व ऑनलाईन नोंदणीसाठी -www.kardaliwan.com/dronagiri

**मर्यादित जागा ... त्वरीत नोंदणी करा...**

**कर्दळीवन सेवा संघ, पुणे** ६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिज जवळ, डेक्कन जिमखाना, पुणे - ०४
मो: 9657709678 / 9371102439 व्हॉटस्‌अ‍ॅप : 7057617018
फोन: 020-25534601 / 25530371 ईमेल : swami@kardaliwan.com

# द्रोणागिरी पर्वत आणि नीती व्हॅली परिक्रमा

वयोमर्यादा
१८ ते ७० वर्षे

## ❖ दिव्य औषधी वनस्पतींचे सान्निध्य आणि औषधीकुंडामध्ये स्नान ❖

## ❖ छोटा अमरनाथ आणि नवीन फूलोंकी घाटी सह ❖



रामायणामध्ये राम रावणाचे घनघोर युद्ध सुरू होते. रावणाचा मुलगा मेघनाद म्हणजेच इंद्रजित याने राम-लक्ष्मणावर ब्रह्मास्त्राचा प्रयोग केला. त्याच्या प्रभावाने राम-लक्ष्मण बेशुद्ध पडले. ते पाहून जणू काही राम-लक्ष्मणाचा मृत्यू झाला असे समजून मेघनाद आनंदाने निघून गेला. त्यावेळी बिभीषणाने लंकेचा राजवैद्य सुशेण याला बोलवून आणले. सुशेणाने हनुमानाला सांगितले की हिमालयामध्ये ऋषभ आणि कैलास हे पर्वत आहेत. त्यांच्यामध्ये एक दिव्य औषधी आणि आयुर्वेदिक वनस्पतींनी युक्त असा एक पर्वत आहे. तो सतत चमकत असतो. त्यावर तुला ४ औषधी वनस्पती दिसतील. त्यांची नावे मृतसंजीवनी, विशल्यकारणी, सुवर्णकरणी आणि संथानी ही आहेत. त्या औषधी वनस्पती तू त्वरित घेऊन ये. त्यानेच राम-लक्ष्मणांना जीवदान मिळू शकेल. हनुमंताने हिमालयाकडे उड्डाण केले आणि तो द्रोणागिरी पर्वताजवळ पोहोचला. मात्र त्याला संजीवनी वनस्पतीची ओळख पटेना. त्याच्याकडे वेळही फार थोडा होता. तेव्हा हनुमंताने द्रोणागिरी पर्वताचा एक भाग उचलला आणि त्याने लंकेकडे प्रयाण केले. त्या द्रोणागिरी पर्वताचा बराच मोठा भाग अजूनही हिमालयामध्ये उत्तराखंड राज्यामध्ये अस्तित्वात आहे आणि त्यावर अजूनही असंख्य औषधी आणि आयुर्वेदिक वनस्पती अस्तित्वात आहेत. द्रोणागिरी पर्वत परिसरातील पहाडी लोकांनी या दिव्य वनस्पती अजूनही टिकवून ठेवल्या आहेत. द्रोणागिरी पर्वत हा स्वयंभू आणि विलक्षण दैवीशक्ती संपन्न पर्वत आहे. त्याची माहिती रामायण काळातही देश विदेशातील वैद्यांना आणि चिकित्सकांना होती. म्हणूनच सुशेणाने हनुमंताला द्रोणागिरी पर्वतावर पाठवले. यावरून संजीवनी वनस्पती निर्माण करण्याची क्षमता फक्त द्रोणागिरी पर्वतामध्येच होती हे लक्षात येते. द्रोणागिरी परिक्रमा करताना आपण ब्रह्मकमळ, फनकमळ, जटामाँसी, कुटकी, फरण, कीडाजडी, हत्तीजडी, अतीस, कुट, ढोलू, बालछडी, छीपी, गन्दरेणी इ. अनेक हिमालयीन दुर्मिळ, दिव्य आणि दैवी औषधी वनस्पतींच्या सान्निध्यामध्ये राहतो. **त्यामुळे आध्यात्मिक अनुभूतींबरोबरच आपल्या वैयक्तिक आरोग्यासाठीही द्रोणागिरी परिक्रमा अत्यंत उपयुक्त ठरते.** द्रोणागिरी परिक्रमेमध्ये आपण नंदाकुंड येथे स्नान करतो. पार्वती देवी येथे नंदादेवी या नावाने ओळखली जाते. महिषासुर जेव्हा शंकराच्या शापाने उन्मत्त होऊन पार्वतीच्या मागे लागला. तेव्हा पार्वती याच नंदाकुंडामध्ये गुप्त झाली अशी कथा आहे. नंदाकुंड आपल्याला दिव्य औषधी स्नान घडविते.

**द्रोणागिरी आणि नंदाकुंड परिसर हा भाग नवीन फुलोंकी घाटी म्हणून ओळखला जातो.** अनेक दुर्मिळ आणि अत्यंत मनमोहक फुले आणि वनस्पती या विभागामध्ये दिसून येतात. द्रोणागिरी समुद्रसपाटीपासून ३५२२ मीटर म्हणजे सुमारे १५००० फूट उंचीवर आहे. याचे विलक्षण वैशिष्ट्य म्हणजे दर तीन महिन्यांनी द्रोणागिरी क्षेत्राचा रंग बदलतो. ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये तो लाल रंगाचा असतो. डिसेंबर ते फेब्रुवारी बर्फामुळे पांढरा होतो. मार्च ते जून तो काळा होतो. जुलै ते सप्टेंबर मध्ये रंगीबेरंगी हिरवाईने नटलेला असतो. द्रोणागिरी पर्वतावर द्रोणागिरी पर्वत देवतेचे मंदिर आहे. पर्वताच्या सुरुवातीला द्रोणागिरी गाव वसलेले आहे. द्रोणागिरी पर्वत परिसरामध्ये अनेक गुफांमध्ये साधू आणि ऋषीमुनी तपःश्चर्या करतात. द्रोणागिरी मार्गावर आपल्याला याक या प्राण्याचे दर्शन होते. नंदा कुंडाजवळ हिमालयीन पर्वत शिखरांचे मनोरम दर्शन घडते. नंदाकुंडाच्या आसपासचा परिसर बर्फाने आच्छादित असून त्याच्या अलौकीक दर्शनाने आपण अक्षरशः मंत्रमुग्ध होतो.

या परिक्रमेदरम्यान आपण छोटा अमरनाथ या स्थळाला भेट देतो. भारताच्या सीमेवरील शेवटचे गाव म्हणजे नीती. त्यानंतर तिबेट चीनची हद्द सुरू होते. या नीती व्हॅलीमधून भारतातून कैलास मानसरोवर यात्रेला जाणारा सर्वात जवळचा मार्ग जातो. पूर्वी नीती हे व्यापाराचे मोठे केंद्र होते. नीती जवळच आपण छोटा अमरनाथ या स्थळाचे दर्शन घेतो. या ठिकाणी एक स्वयंभू गुहा असून त्यामध्ये चुना आणि पाषाणातून तयार झालेले आणि हिमकणांनी आच्छादित असे अत्यंत मनोहारी शिवलिंग आहे. हे स्थान छोटा अमरनाथ म्हणून आता उदयास येत आहे.

- **सहयोगी शुल्क** - हरिद्वार ते हरिद्वार - रु. ३०,०००/- (१० रात्री आणि ११ दिवस)
- शुल्क दोन टप्प्यामध्ये भरता येईल. १. नोंदणी अर्ज बरोबर रु. १०,०००/- २. यात्रा प्रारंभ तारखेपूर्वी १५ दिवस उरलेली रक्कम

**बँक खात्याची माहिती**

बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र, डेक्कन जिमखाना शाखा, पुणे ४११००४

खात्याचे नाव : हिमाद्री टूर्स अॅण्ड ट्रेक्स **Himadri Tours and Treks**

खाते क्रमांक : ६०२४६५९९३९१ **IFSC Code : MAHB0000003**

## परिक्रमा कार्यक्रम - हरिद्वार ते हरिद्वार -१७ ते २७ सप्टेंबर २०२०

- **पहिला दिवस :-** हरिद्वार आगमन व मुक्काम
- **दुसरा दिवस :-** जोशीमठ आगमन व मुक्काम
- **तिसरा दिवस :-** सकाळी जुम्मा गावापर्यंत ५० किमी वाहनप्रवास - नंतर रुईंग गावी ६ किमी चालत ट्रेक व मुक्काम
- **चौथा दिवस :-** रुईंग ते द्रोणागिरी गाव - ८ किमी ट्रेक - मुक्काम
- **पाचवा दिवस :-** द्रोणागिरी पर्वत परिक्रमा - ८ किमी
- **सहावा दिवस :-** द्रोणागिरी ते नंदाकुंड - स्नान - परत द्रोणागिरी मुक्काम - नविन फूलोंकी घाटी - ७ किमी
- **सातवा दिवस :-** जुम्मा गाव - ११ किमी ट्रेक - वाहनाने २० किमी गमशाली येथे मुक्काम
- **आठवा दिवस :-** नीती व्हॅली + छोटा अमरनाथ दर्शन परत गमशाली
- **नववा दिवस :-** पिंपल कोटी - १४० किमी वाहन प्रवास
- **दहावा दिवस :-** हरिद्वारकडे प्रयाण - मुक्काम
- **अकरावा दिवस :-** हरिद्वार चेक आऊट सकाळी १० वाजता

**विशेष सूचना : - यात्रा कार्यक्रम नियोजित आहे. काही अपरिहार्य कारणे, नैसर्गिक समस्या, दरडी कोसळणे, गाडी ब्रेक डाऊन होणे, रस्ता बंद होणे, राजकीय समस्या, आंदोलने इ. आयोजकांच्या मर्यादांपलिकडे काही घटना घडल्यास कार्यक्रमपत्रिकेमध्ये बदल घडू शकतो याची कृपया नोंद घ्यावी. त्यावेळी सर्व प्रकारचे सहकार्य करावे लागेल.**

- **नोंदणी कशी करावी?**

१) नोंदणी अर्ज पूर्ण भरून, सही करून सोबत आधारकार्ड, आणि एक फोटो द्यावा.

२) नोंदणीच्या वेळी रु. १०,०००/- एवढी रक्कम भरावी लागेल. यात्रेच्या तारखेआधी १५ दिवस उरलेली रक्कम भरावी लागेल.

३) **एकदा केलेली नोंदणी कोणत्याही कारणाने रद्द करता येणार नाही. भरलेली रक्कम परत मिळणार नाही. यात्रे आधी २० दिवस आपण बदली व्यक्ती देवू शकता.**

- **द्रोणागिरी पर्वत परिक्रमार्थींना महत्त्वाच्या सूचना**

१) प्रत्येक परिक्रमार्थीने परिक्रमेदरम्यान समूहाबरोबरच चालायचे आहे. स्वतंत्रपणे किंवा एकट्याने चालता येणार नाही.

२) हिमालयातील उंचीवरील पर्वतरांगामधील ही परिक्रमा आहे. प्रत्येक परिक्रमार्थीला यासाठी तयार केलेले नियम आणि सूचना यांचे पालन करावे लागेल.

३) नोंदणी करताना परिक्रमार्थींनी द्रोणागिरी पर्वत परिक्रमा करण्यास शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या तंदुरूस्त आहेत याची खात्री करून घ्यावी, ही विनंती.

४) द्रोणागिरी पर्वत परिक्रमेसारख्या साहसी अध्यात्मिक परिक्रमांमध्ये काही प्रमाणामध्ये निश्चितच जोखिम असते. प्रत्येक परिक्रमार्थीने ती नीट समजून घ्यावी आणि आपले जवळचे कुटुंबीय, नातेवाईक यांना त्याची कल्पना द्यावी. प्रत्येक परिक्रमार्थीने पूर्णतः स्वतःच्या जबाबदारीवर ही परिक्रमा करावी. कोणतीही अनपेक्षित घटना घडल्यास कोणत्याही कारणाने आयोजकांना जबाबदार धरता येणार नाही आणि आयोजकांवर कोणतीही कायदेशीर जबाबदारी असणार नाही याची नोंद प्रत्येक परिक्रमार्थींनी घ्यावी, ही विनंती.

५) परिक्रमेदरम्यान फक्त शाकाहारी भोजन आणि थाळी सिस्टीम व्यवस्था केलेली आहे याची नोंद घ्यावी.

६) कोणताही परिक्रमार्थी त्याच्या वर्तनामुळे, शारीरिक परिस्थितीमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे परिक्रमा करण्यास अयोग्य ठरला तर त्याला परिक्रमेमधून वगळण्याचा, परत पाठवण्याचा अधिकार परिक्रमा प्रमुखाकडे असेल याची कृपया नोंद घ्यावी. अशा वगळलेल्या व्यक्तींना कोणताही आर्थिक परतावा मिळणार नाही. यावेळी परिक्रमा प्रमुखाचा निर्णय सर्वांना बंधनकारक असेल.

७) कृपया नोंदणी करण्यापूर्वी विनासंकोच परिक्रमेची सर्व माहिती समजावून घ्यावी. शंका समाधान करून घ्यावे. त्यानंतरच नोंदणी करावी.

८) पोनी/घोडा तसेच वैयक्तिक मदतनीस शेर्पा अधिक रक्कम भरून उपलब्ध आहेत. ज्यांना आवश्यकता आहे त्यांनी आधी कल्पना द्यावी.

९) सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायलयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र हे राहिल.

## द्रोणागिरी पर्वत परिक्रमेची तयारी आणि कपडे व अन्य आवश्यक सामानासंबधी सूचना

**अ)** परिक्रमेदरम्यान आपण हिमालयामध्ये १०,००० ते १५,००० फूट उंचीवर चालत जातो. हिमालयातील लहरी हवामान, थंड वारे, अवकाळी पाऊस, बर्फातून प्रवास या गोष्टी नीट समजून घेतल्या पाहिजेत. यात्रेआधीपासून तीन महिने रोज किमान ६ ते ८ किमी चालण्याचा सराव करावा. त्याचबरोबर दीर्घश्वसन आणि प्राणायाम याचा अभ्यास करावा. हिमालयातील परिक्रमा ही फक्त साहसी नसून आपल्या शारिरीक आणि मानसिक क्षमतांची खडतर परीक्षा घेणारी आहे, त्यामुळे आपल्या शरीराची सर्वात जास्त काळजी आपल्यालाच घ्यायची आहे हे प्रत्येक परिक्रमार्थीने लक्षात ठेवावे. आपल्याबरोबर कमीत कमी सामान तसेच थंडी वाऱ्यापासून, पाऊसापासून रक्षण करणारे कपडे आपल्या बरोबर असावेत. प्रत्येक परिक्रमार्थीने खालील वस्तू आपल्याबरोबर घ्याव्यात अशी सूचना आहे.

१) कानटोपीसह वाऱ्यापासून संरक्षण करणारे जॅकेट – १
२) पूर्ण बाह्याचे स्वेटर – १
३) लोकरीचे हातमोजे १, लोकरीचे पायमोजे – १, सूती पायमोजे–२
४) पँट– टी शर्ट / सलवार कमीज ३ ते ४ सेट
५) ट्रेकींगसाठी मजबूत शूज – १ त्यासोबत शू लेस –२ (नेहमीचे बूट ट्रेकींगसाठी चालणार नाहीत.)
६) पाण्याची बाटली.
७) सन ग्लास गॉगल.
८) छोटी LED बॅटरी सोबत २ सेल एक्स्ट्रा.
९) रेन कोट (मोठा आकार)
१०) सामानासाठी मध्यम आकाराची सॅक – १
११) छोटी पाठीवरची ट्रेकींगसाठी मजबूत सॅक.
१२) सन स्क्रिन लोशन.
१३) रबरी स्लीपर्स इ.
१४) कमरेचा पाऊच – ज्यात कॅमेरा, पैसे, औषधे, कागदपत्रे ठेवता येतील.

**ब)** परिक्रमे दरम्यान सावध आणि आत्मविश्वासपूर्वक चाल अवश्यक आहे. अवघड वाटांवर चालताना सर्वांच्या बरोबरीने शेर्पा आणि गाईड यांचे सहकार्य घ्यायचे आहे. एकट्याने कुठलेही धाडस करु नये. परिक्रमा समूहाने करायची आहे. आपली आणि आपल्या समूहाची काळजी आपल्यालाच घ्यायची आहे. आपले लगेज ७ कि.ग्रॅ. एवढ्या मर्यादेमध्ये असावे. जास्त सामानासाठी चार्जेस द्यावे लागतील.

**क)** रात्रीचा मुक्काम हॉटेल/गेस्टहाऊस/तंबू मध्ये आहे. एका रूममध्ये तीन ते चार व्यक्ती असतील. चपाती/ पूरी, डाळ, भाजी, भात, लोणचे, पराठे, सूप ,चहा, कॉफी, आणि स्थानिक भाज्या यांचा आहारात समावेश असेल.